दै. गोदातीर दि. 15/12/2025

चोऱ्या करणारी आंतरराज्यीय मध्यप्रदेश येथील टोळीचा पर्दाफाश

# स्थानिक गुन्हे शाखेने केली दोघांना अटक, चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – मध्यप्रदेश येथून नांदेड जिल्ह्यात वास्तव्य करून जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्या करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. या टोळीतील दोन सदस्यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे यांच्या पथकांने मध्यप्रदेश व नांदेड येथून अटक करून त्यांच्याकडून जिल्ह्यातील सात चोरीचे गुन्हे उघड केले आहे. चोरट्यांकडून नगदी चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन आरोपींपैकी एक बाल गुन्हेगार असल्याचे सांगण्यात आले.

नांदेड जिल्ह्यातील चोरीच्या घटना उघड करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आदेशित केले होते. जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चोरीचे धागेदोरे हे मध्यप्रदेश येथे असल्याची गोपनीय माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे यांना मिळाली. त्यांनी आपल्या दोन टीम तयार करून एक टीम मध्यप्रदेश येथे तब्बल दहा दिवस थांबून माहिती घेतली. तर दुसरी टीम नांदेडमध्ये काम करत होती. यावेळी तेथील स्थानिक पोलिसांचीही मदत घेण्यात आली होती. मिळालेल्या गोपनीय माहितीवरून मध्यप्रदेश येथील टोळीतील दोन चोरट्यांना अटक केली. त्यातील आरोपी अनिकेश गजेंद्र सिसोदिया (वय २० राहणार मवाखेडी, तालुका मंगावली, जिल्हा अशोकनगर मध्य प्रदेश) व एक अल्पवयीन अशा दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे असलेल्या बॅगमधून नगदी चार लाख एक हजार रुपये जप्त करण्यात आले. या चोरट्यांनी आपल्या अन्य साथीदारांसोबत जिल्ह्यातील अर्धापूर, हदगाव, भाग्यनगर, वजिराबाद, भोकर, किनवट व लोहा येथे केलेल्या चोऱ्यामधील रक्कम असल्याचे सांगितले.

सदर आरोपी हे बँकेमध्ये पैसे काढणाऱ्या व्यक्तीवर पाळत ठेवून तसेच लग्नामध्ये नजर चुकवून चोरी करण्याच्या सवयीच्या आहेत. विधीसंघर्षग्रस्त बालकासह आरोपी अनिकेश ताब्यात घेऊन मुद्देमालासह पुढील कारवाईसाठी अर्धापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे, सहाय्यक फौजदार गुंडेराव कर्ले, मिलिंद नरबार, देविदास चव्हाण, विठ्ठल शेळके, मोतीराम पवार, सिद्धार्थ सोनसळे यांनी परिश्रम घेतले. पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी कौतुक केले.